# पुणे विद्यापीठ
# गणेशखिंड, पुणे — ४११ ००७

संदर्भ — परीक्षा/वाणिज्य/३१७१ दिनांक १३/०७/२०१०

मा.प्राचार्य,
सर्व संलग्न बी.बी.ए., बी.सी.ए., महाविद्यालये,

<u>विषयः—</u> बी.बी.ए./बी.सी.ए. एप्रिल/मे २०१० परीक्षेच्या निकालाबाबत....

महोदय/महोदया,

बी.बी.ए. व बी.सी.ए. अभ्यासक्रमाच्या एप्रिल/मे २०१० मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक १४/०७/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येईल.

१. पुणे जिल्हा व पुणे शहरातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल दि. १४/०७/२०१० सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत परीक्षा विभागातून घेऊन जावयाचे आहेत.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांच्या निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून दिनांक १४/०७/२०१० रोजी दुपारी ११.०० ते २.०० या वेळेत घेऊन जावयाचे आहेत.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखादया विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्याला परस्पर विद्यापीठात न पाठविता महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून दयावीत. यानंतर त्यातील दुरूस्त्या त्वरीत करून घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१० पासून सत्र ३ ते सत्र ६ चे परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाकडून संगणकीय परीक्षा अर्ज २४/०७/२०१० उपलब्ध करून दिले जातील, ते विद्यार्थ्यांकडून खालील तारखेपर्यंत भरून घेऊन पुन्हा विद्यापीठाकडे विहित शुल्कासह त्वरीत जमा करावयाचे आहेत.

| परीक्षेचे नाव | विनाविलंब शुल्क दिनांक | विलंबशुल्कासह दिनांक |
|---|---|---|
| बी.बी.ए./बी.सी.ए | **०३/०८/२०१०** | **१०/०८/२०१०** |

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल व परीक्षा अर्ज वेळेत घेऊन जाण्याची व वितरीत करण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रकाकरिता

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:
१.मा.उपकुलसचिव (परीक्षा.२)
२.मा.सर्व सहायक कुलसचिव (परीक्षा.)
३.विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक व अहमदनगर, संबंधित महाविद्यालयांना वेळेवर निकाल देण्याची व्यवस्था करावी.
४.मा.गृहव्यवस्थापक गृहव्यवस्थापन विभाग अहमदनगर, नाशिक जिल्हयासाठी दिनांक १४/०७/२०१० रोजी सकाळी ठिक ७.०० वाजता दोन स्वतंत्र गाडया उपलब्ध करून देण्यात याव्यात.